नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७६ Issue - 176 | वार - सोमवार दि. २३ नोव्हेंबर २०२६ Blow- Monday Date 23 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्यातील ३,८३२ अंगणवाड्या होणार 'स्मार्ट' : मंत्री आदिती तटकरे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील अंगणवाडी केंद्रात देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये आधुनिक शैक्षणिक साहित्य आणि पायाभूत सुविधांची सुधारणा करत ३,८३२ अंगणवाड्यांना 'स्मार्ट अंगणवाडी' करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

अंगणवाडी केंद्रांमधून ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण, आरोग्य, पूर्वप्राथमिक शिक्षण तसेच गर्भवती महिला, स्तनदा मातांना पोषण,आरोग्याशी संबंधित सेवा दिल्या जातात. आदर्श अंगणवाडी केंद्र तयार करून त्यात आधुनिक सुविधा देत बालकांना आनंददायी, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबविण्यात येत आहे. शासकीय जागेत विद्युत जोडणी उपलब्ध असलेल्या केंद्रांचा विचार करून ३,८३२ अंगणवाडी केंद्रांना स्मार्ट करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या स्मार्ट अंगणवाडी किटमध्ये विविध आधुनिक सुविधा आणि साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ई-लर्निंगसाठी आवश्यक हार्डवेअर व सॉफ्टवेअर, स्वच्छ भारत किट, वॉटर प्युरिफायर, हात धुण्यासाठी बेसिन सुविधा, अंगणवाडी इमारतीची रंगरंगोटी, इमारतीची आवश्यक किरकोळ दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टिंग तसेच स्वयंपाकघराचे आधुनिकीकरण याबाबींचा समावेश आहे.

अंगणवाडी केंद्रांमधील सुविधा आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी टप्प्याटप्प्याने स्मार्ट अंगणवाड्यांची निर्मिती करण्यात येत असून बालकांच्या पोषण, आरोग्य आणि प्रारंभिक शिक्षणासाठी अधिक गुणवत्तापूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

राजस्थानातून परतणाऱ्या धुळ्यातील पवार कुटुंबाच्या वाहनाला भीषण अपघात, ९ ठार

६ जण गंभीर जखमी; देवदर्शनावरून परतताना उभ्या असलेल्या ट्रकला जोरात धडक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धुळे: राजस्थानातील खाटू श्याम मंदिर येथून दर्शन घेऊन परतताना धुळ्यातील पवार कुटुंबावर काळाने घाला घातला आहे. कोटा इथं पोहोचल्यानंतर सदर भाविकांच्या गाडीने रस्त्यात उभ्या असलेल्या ट्रकला जोरात धडक दिली. या भीषण अपघातात गाडीतील ९ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. देवदर्शनावरून परतताना झालेल्या या अपघातात एकाच कुटुंबातील ९ जणांनी जीव गमावल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. वाहन चालवत असताना चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानमधील कोटा येथे धुळे जिल्ह्यातील प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या फोर्स ट्रॅव्हलर वाहनाला मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला असून, ६ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये धुळे शहरातील शांतुषानगर, नवनाथ नगर तसेच शिंदखेडा तालुक्यातील अमराळे येथील रहिवाशांचा समावेश आहे. अपघातग्रस्त वाहनात एकूण १५ व्यक्ती प्रवास करत होत्या. कोटा येथील पोलीस नियंत्रण कक्षाकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे धुळे जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाने ही माहिती दिली आहे.

अपघातामध्ये ठार झालेल्या व्यक्तींची नावे: १. सजन दौलत पवार २. उषाबाई सजन पवार ३. माधवी गणेश पवार ४. साऊ गणेश पवार ५. कैलास भगवान पवार ६. अनिता कैलास पवार ७. जानवी कैलास पवार ८. बाबूलाल दौलत पवार ९. सुशीलाबाई बाबुलाल पवार

अपघातातील जखमी व्यक्तींची नावे: मनीषा शरद पवार (४१ वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. मयुरी शरद पवार (२० वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. जगदीश कैलास पवार (१० वर्षे), रा. अमराळे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. श्रीजीत गणेश पवार (४ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. शरद बाबूलाल पवार (४५ वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. गणेश सज्जन पवार (३२ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे.

हैदराबादमध्ये २ बॉम्बस्फोटांची धमकी; ३०० जणांना ठार मारण्याचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हैदराबाद : लष्कर-ए-तोयबा (डशढ) या दहशतवादी संघटनेच्या नावाने कथितरित्या देण्यात आलेल्या धमकीनंतर हैदराबाद पोलिसांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शहरात दोन बॉम्बस्फोट घडवून किमान ३०० जणांना ठार मारण्याचा कट असल्याची धमकी एका पत्रातून देण्यात आल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

लतीफ भटच्या मृत्यूचा बदला घेण्याची धमकी

हैदराबादमधील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात या धमकीचा उल्लेख करण्यात आला आहे. हैदराबाद शहर पोलीस सहआयुक्त (विशेष शाखा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्र पाठवणाऱ्याने १८ नोव्हेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील झांगलपोरा येथे झालेल्या चकमकीचा संदर्भ दिला आहे.

या चकमकीत दक्षिण काश्मीरमधील लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी लतीफ भट ठार झाला होता. त्याच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी हैदराबादमध्ये मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यासारखी घटना घडवण्याची धमकी पत्रात देण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

हॉटेल, रेल्वे स्थानकांसह गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवली

या धमकीनंतर काचीगुडा येथील हॉटेल टुरिस्ट प्लाझा आणि काचीगुडा रेल्वे स्थानकासह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हॉटेल्स, रेल्वे आणि बस स्थानके, धार्मिक स्थळे तसेच गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संशयास्पद व्यक्ती, बेवारस वस्तू, वाहने आणि असामान्य हालचालींवर नजर ठेवण्यास सांगण्यात आले आहे. तसेच गस्त वाढवणे, घातपातविरोधी तपासणी करणे आणि संबंधित सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, धमकीच्या पत्राची सत्यता आणि त्यामागील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांकडून जारी होणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मृद व जलसंधारण आणि कृषी विभागाच्या समन्वयातून कामांचा वेग वाढविण्याचा निर्णय : मंत्री संजय राठोड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यात एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी नियोजन केले आहे. आगामी पावसाळ्यापूर्वी म्हणजेच ३० जून २०२७ पर्यंत राज्यातील जास्तीत जास्त गावांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याने मृद व जलसंधारण विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल विभागासहित अन्य विभागाच्या समन्वयातून कामे करण्याचा दुष्काळावरील मा. मंत्रिमंडळ उपसमितीने निर्णय घेतला असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले.



स्वतंत्र मृद व जलसंधारण विभागाची स्थापना झाल्यापासून राज्यात कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, साठवण तलाव, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव तसेच गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार यांसारखी मोठी आणि तांत्रिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण जलसंधारणाची कामे वेगाने व पारदर्शक पद्धतीने सुरू आहेत. विभागाने या कामांमध्ये प्रशासकीय आणि तांत्रिकदृष्ट्या प्रभावी कामगिरी केली आहे, असे मंत्री संजय राठोड यांनी स्पष्ट केले.

मर्यादित कालावधीत राज्यभर मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे पूर्ण करायची आहेत. त्यासाठी उपलब्ध यंत्रणेचा अधिकाधिक प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. मृद व जलसंधारण विभागाची यंत्रणा सक्षम असली तरी ग्रामीण भागात थेट शेतकऱ्यांशी जोडलेल्या कृषी (पान २ वर...)

सहा वर्षांच्या सेवेनंतर पुन्हा नियमित भरतीची संधी

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच विवाहाची परवानगी

अग्निवीरांसाठी दिलासादायक निर्णय; दोन वर्षांच्या सेवा मुदतवाढीदरम्यान विवाहाला परवानगी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : अग्निपथ योजनेअंतर्गत सैन्यात भरती झालेल्या अग्निवीरांना दोन वर्षांच्या सेवा मुदतवाढीदरम्यान विवाह करण्याची परवानगी दिली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, यासाठी त्यांना दुसऱ्या 'टूर ऑफ ड्युटी'दरम्यानचे संक्षिप्त प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करावे लागणार आहे. नोंदणी केलेल्या अग्निवीरांना पाठवण्यात आलेल्या पत्राचा संदर्भ देत सूत्रांनी ही माहिती दिल्याचे वृत्त आहे.



अग्निपथ योजनेनुसार, भरतीच्या वेळी उमेदवार अविवाहित असणे आवश्यक आहे. तसेच सुरुवातीच्या ४ वर्षांच्या सेवा कालावधीत त्यांना विवाह करता येत नाही. आता दोन वर्षांच्या मुदतवाढीचा पर्याय निवडणाऱ्या अग्निवीरांसाठी या नियमात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दुसऱ्या टप्प्यात प्रवेश घेतल्यानंतर अग्निवीरांना काही काळाच्या विश्रांतीनंतर सुमारे ४ आठवड्यांचे संक्षिप्त प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना विवाह करण्याची परवानगी दिली जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. २०२२ मध्ये सुरू झालेल्या अग्निपथ योजनेअंतर्गत जवानांची सुरुवातीची सेवा ४ वर्षांची असते. या कालावधीनंतर २५ टक्के अग्निवीरांची गुणवत्तेच्या आधारावर नियमित सेवेसाठी निवड केली जाते. उर्वरित पात्र अग्निवीरांना दोन वर्षांच्या 'सेकंड टूर ऑफ ड्युटी'चा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. भारतीय नौदलाच्या पहिल्या तुकडीने आपला ४ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. भारतीय लष्कर आणि हवाई दलातील पहिल्या तुकड्यांचाही कार्यकाळ लवकरच पूर्ण होणार आहे. या पार्श्वभूमीवर दोन वर्षांच्या सेवा मुदतवाढीचा पर्याय महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रशिक्षित मनुष्यबळ अधिक काळ सैन्यात उपलब्ध राहावे आणि अनुभवी जवानांना सेवेत कायम ठेवता यावे, या उद्देशाने 'सेकंड टूर ऑफ ड्युटी'ची संकल्पना पुढे आणण्यात आली आहे. या पर्यायातून एकूण ६ वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांना नियमित भरतीसाठी आणखी एक संधी मिळणार असल्याचे वृत्त आहे. संरक्षण दल प्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी अग्निपथ योजना अंतिम नसून त्यात वेळोवेळी बदल आणि सुधारणा होत राहतील, असे यापूर्वी स्पष्ट केले होते.

तरुण अग्निवीरांच्या वैयक्तिक आयुष्याचाही विचार

अग्निपथ योजनेत भरती होणाऱ्या तरुणांचे वय साधारण १७.५ ते २१ वर्षे असते. चार वर्षांची सेवा पूर्ण होईपर्यंत त्यांचे वय २१ ते २५ वर्षांच्या दरम्यान असू शकते. अशा परिस्थितीत सेवा मुदतवाढीदरम्यान विवाहाची परवानगी मिळाल्यास अग्निवीरांना वैयक्तिक आयुष्याचे नियोजन करणे सोपे होऊ शकते.

आधीच दुष्काळ, त्यात शेतातील विद्युत तारांच्या स्पर्शाने भीषण आग

शेतकऱ्याचा पाच एकरावरील ऊस जळून खाक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बीड : राज्यात दुष्काळाची भीषण दाहकता पाहायला मिळत असून पाण्याविना शेतकऱ्यांच्या शेतातील पीकं वाळून चालली आहेत. याशिवाय जनावरांना जगवण्याचा मोठा प्रश्न बळाराजापुढे पडला आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात ह्या दुष्काळी परिस्थितीचं विदारक चित्र आहे. आधीच दुष्काळ, त्यात हाती आलेला ऊसही जळून खाक झाल्याने बीड जिल्ह्यातील एका शेतकऱ्यावर मोठं संकट कोसळलय. शेतात डौलात उभा असलेला पाच एकर ऊस जळून खाक झाल्याची दुर्घटना घडली.

बीड जिल्ह्याच्या सातेफळ येथील एक शेतकऱ्याचा पाच एकर ऊस जळून खाक झाला आहे. शेतात असलेल्या विद्युत तारांच्या घर्षणामुळे ठिणग्या पडल्या आणि यामुळे लागलेले आगीने पाच एकरावरील ऊस जळून खाक झाला. ऊसाच्या



फडाला लागलेली ही आग इतकी भयंकर होती की या आगीच्या ज्वाळा दूरपर्यंत दिसून येत होत्या. आपल्या डोळ्यादेखत ऊसाला आग लागल्याचे पाहून ही आग विझवण्यासाठी गेलेले शेतकरी संजीवन कांदे आग आटोक्यात आणण्यासाठी धडपडत होते, पण या आगीत भाजून त्यांच्या हाताला देखील मोठी जखम झाली आहे.

दरम्यान, आगीची माहिती मिळताच केज नगरपंचायतीचे बंब आग विझवण्यासाठी दाखल झाले. परंतु, आगीने रौद्ररूप धारण केल्याने ही आटोक्यात आली नाही. मात्र, या आगीमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले. आधीच दुष्काळाने होरपळलेल्या बळीराजावर हे संकट ओढावल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. हातातोंडाशी आलेलं ऊसाचं पीक, आता (पान २ वर...)

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

अंगणवाड्यांचे चित्र बदलणार

राज्यातील अंगणवाड्यांचं चित्र आता बदलणार आहे. अंगणवाडी केंद्रात मिळणाऱ्या सेवांमध्ये आधुनिक शैक्षणिक साहित्य आणि पायाभूत सुविधांची भर घालत ३,८३२ अंगणवाड्यांना 'स्मार्ट अंगणवाडी' करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.अंगणवाडी केंद्रांमधून ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण, आरोग्य आणि पूर्वप्राथमिक शिक्षण दिलं जातं. तसेच गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना पोषण व आरोग्याशी संबंधित सेवा दिल्या जातात. ही केंद्रं अधिक आकर्षक, सुरक्षित आणि आनंददायी व्हावीत, यासाठी स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबवली जात आहे. शासकीय जागेत असलेल्या आणि जिथे वीज जोडणी उपलब्ध आहे, अशा केंद्रांचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. अशा ३,८३२ केंद्रांना स्मार्ट करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना स्मार्ट किट दिलं जाणार आहे. यामध्ये ई-लर्निंगसाठी लागणारं हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर असणार आहे. त्यामुळे लहान मुलांना खेळातून, गाणी, गोष्टी आणि चित्रांमधून शिकणं अधिक सोपं होणार आहे. याशिवाय स्वच्छ भारत किट, वॉटर प्युरिफायर, हात धुण्यासाठी बेसिनची सुविधा दिली जाणार आहे. अंगणवाडी इमारतीला रंगरंगोटी केली जाणार आहे. इमारतीची आवश्यक किरकोळ दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि स्वयंपाकघराचं आधुनिकीकरणही यामध्ये समाविष्ट आहे. अंगणवाडी केंद्रातील सुविधा आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी टप्प्याटप्प्याने स्मार्ट अंगणवाड्यांची निर्मिती केली जात आहे. मुलांच्या पोषण, आरोग्य आणि सुरुवातीच्या शिक्षणासाठी अधिक गुणवत्तापूर्ण वातावरण तयार करण्याचा प्रयत्न असल्याचं मंत्री तटकरे यांनी सांगितलं. पूर्वी अंगणवाडी म्हणजे फक्त पोषण आहाराचं केंद्र असं चित्र होतं. आता मात्र ते मुलांच्या सर्वांगीण विकासाचं केंद्र बनत आहे. स्मार्ट अंगणवाडीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब कुटुंबातील मुलांनाही चांगल्या सुविधा मिळणार आहेत. शिक्षणाची गोडी लहानपणापासूनच लागावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेतून महाराष्ट्राच्या खेळाडूंना जागतिक संधी : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुण्यात इंडिया इंटरनॅशनल ओपन तायक्वांदो चॅम्पियनशिपचे उद्घाटन; २० देशांतील खेळाडू सहभागी, मुलींना क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन देण्याचे आवाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क





पुणे : तायक्वांदो हा केवळ पदक मिळविण्याचा खेळ नसून शारीरिक ताकदीसोबत मानसिक शिस्त, संयम, एकाग्रता, आत्मविश्वास आणि प्रतिस्पर्ध्याबद्दल आदर शिकवणारा खेळ आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमुळे महाराष्ट्रातील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या खेळाडूंसोबत घरच्या मैदानावर खेळण्याची संधी मिळत असून, अशा स्पर्धांना राज्य सरकारचे नेहमीच सहकार्य राहील, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित इंडिया इंटरनॅशनल ओपन तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६ च्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. २० ते २६ नोव्हेंबरदरम्यान सात दिवस चालणाऱ्या या जी-१ दर्जाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत २० देशांतील खेळाडू, प्रशिक्षक आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

या उद्घाटन समारंभास आशियाई तायक्वांदो संघटनेच्या उपाध्यक्ष नॅन्सी अदनान हसन अल-हिंद (जॉर्डन), फराज अल्फथेल (कुवेत), इस्माईल मोसी (इजिप्त), सुरज कश्यप सिंह (दिल्ली), राज्याचे क्रीडा आयुक्त दीपक सिंघल, भारतीय तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, भारतीय तायक्वांदोचे संचालक ली जँग ही, आयोजक डॉ. रजत दीक्षित, पवनसिंग जी, नगरसेवक अमोल बालवडकर, सुमेध मगर, पूनम विधाते, श्री.गनात्रा तसेच तायक्वांदो क्षेत्रातील मान्यवर संग्रामसिंग आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला शौर्य, शिस्त आणि स्वाभिमानाचे संस्कार दिले. आज क्रीडांगणावर उतरणाऱ्या खेळाडूंमध्येही हेच गुण दिसून येतात.

या स्पर्धेच्या निमित्ताने दिवंगत अजितदादांची आठवण होत असून, त्यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्षे काम करत खेळाडूंना संधी आणि सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने पाठबळ दिले. महाराष्ट्रात अशी आंतरराष्ट्रीय स्पर्धा होताना त्यांना निश्चितच आनंद झाला असता, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते, तसेच क्रीडाक्षेत्रातही शहराचे महत्त्व मोठे आहे. 2008 च्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेपासून बालेवाडी क्रीडा संकुलात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा झाल्या असून, या स्पर्धेमुळे त्या परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला जात आहे, असे त्या म्हणाल्या.

मुलींना खेळासाठी प्रोत्साहन द्या

तायक्वांदोमुळे मुलींना स्वसंरक्षणाचे बळ मिळते, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. मैदानावर धैर्याने उभ्या राहणाऱ्या मुली जीवनातील आव्हानांनाही तितक्याच धैर्याने सामोरे जाऊ शकतात. राजमाता जिजाऊ आणि महाराणी ताराराणींच्या पराक्रमाचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रातील मुली आज आंतरराष्ट्रीय मैदानावर देशाचे नाव उंचावत आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, त्यांच्या स्वप्नांना बळ द्यावे आणि त्यांना आवश्यक पाठबळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिंकणे महत्त्वाचे असले, तरी खिलाडूवृत्ती त्याहून मोठी आहे. आज पराभूत झालेला खेळाडू उद्या विजयासाठी नव्या तयारीने उभा राहतो. हीच खेळाची खरी ताकद आहे. जिल्हास्तरीय स्पर्धांमधून ग्रामीण आणि शहरी भागातील मुलांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळत असून, त्यातून प्रतिभावान खेळाडू पुढे येत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासन खेळाडूंना चांगल्या सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा अनुभव मिळावा यासाठी कटिबद्ध आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांतील मुलांमध्येही मोठी गुणवत्ता असून, ती शोधून योग्य संधी उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. राज्यात अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजनाला शासनाचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना शुभेच्छा देत, या स्पर्धेत उत्तम खेळ, नवे विक्रम आणि देश-विदेशातील खेळाडूंमध्ये मैत्रीचे नवे बंध निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मृद व जलसंधारण आणि कृषी विभागाच्या समन्वयातून कामांचा वेग वाढविण्याचा निर्णय : मंत्री संजय राठोड

(पान १ वरून..) विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाल्यास कामांचा विस्तार आणि गती वाढण्यास मदत होणार आहे. याच व्यावहारिक दृष्टिकोनातून मंत्रिमंडळ उपसमितीने दोन्ही विभागांमध्ये समन्वय साधण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय कोणत्याही विभागाच्या कार्यक्षमतेवर अविश्वास व्यक्त करणारा नसून, सामूहिक जबाबदारीतून उद्दिष्टपूर्ती पूर्ण करण्यासाठी घेतलेला निर्णय आहे, असेही त्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण आणि कृषी हे दोन्ही विभाग शेतकऱ्यांच्या हितासाठी एकमेकांना पूरक असून, दोन्ही विभागांच्या संयुक्त प्रयत्नांतून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचे शासनाचे ध्येय आहे. त्यामुळे या निर्णयात श्रेयवादाचा कोणताही प्रश्न नसून, संकटाच्या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे, असे मंत्री राठोड यांनी नमूद केले.

जलसंधारणाच्या कामांमध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखण्यासाठी शासनाने 'जलदर्पण' पोर्टल, एमएच-युआयडी (चकणखऊ) आणि जिओ-टॅगिंग यांसारख्या आधुनिक तांत्रिक प्रणालींचा अवलंब केला आहे. कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना या प्रणालींचा वापर तसेच कामांच्या तांत्रिक प्रक्रियेबाबत मृद व जलसंधारण विभागाकडून आवश्यक ते सर्व तांत्रिक मार्गदर्शन आणि सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल. राज्यातील प्रत्येक गावात जलसंधारणाची कामे प्रभावीपणे पूर्ण करून पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही मंत्री संजय राठोड यांनी स्पष्ट केले.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाचे प्रभावी नियोजन, पशुपालकांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने संभाव्य चारा टंचाईच्या परिस्थितीवर प्रभावीपणे मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध स्तरांवर नियोजन करण्यात येत आहे. चारा बियाणे वाटप, सिंचनाची सुविधा असलेल्या क्षेत्रात चारा उत्पादन, शासकीय जमिनीवर चारा पिकांची लागवड, मुरघास निर्मिती, ऊस पाचट व इतर पीक अवशेषांचा चारा म्हणून वापर अशा बहुआयामी उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. याशिवाय पशुपालकांमध्ये चारा उत्पादनाबाबत जनजागृती, जनावरांचे लसीकरण आणि आरोग्य तपासणी शिबिरांचेही नियोजन करण्यात येत आहे.

चारा बियाणे वाटपासाठी अतिरीक्त निधी

चारा उत्पादनाला चालना देण्यासाठी मका चारा बियाणे वाटपाकरिता २ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला असून, ६६.७२१ मे. टन बियाणे उपलब्ध झाले आहे. जिल्ह्यात एकूण ५४१५ लाभार्थींना चारा बियाणे वाटप करण्याचे नियोजन आहे. यामधून ११८७७० मे. टन चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. आजअखेर २७.५३० मे. टन बियाणे पशुपालकांना वाटप करण्यात आले आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२०२७ अंतर्गत चारा बियाणे वाटपासाठी ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यातून ९०३५७ किलो चारा बियाणे १८ हजार ९६७ लाभार्थ्यांना चारा बियाणे वाटप करण्यात आले असून, ४ हजार ८७३ हेक्टर क्षेत्रावर चारा लागवड करण्यात आली आहे. या लागवडीतून सुमारे ४५५ मे. टन हिरवा चारा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

सिंचन सुविधा असलेल्या क्षेत्रात चारा उत्पादन

जिल्ह्यातील १२ हजार १८ शेतकऱ्यांची प्राथमिक माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यापैकी ८ हजार ६७२ शेतकऱ्यांकडे सिंचन सुविधा उपलब्ध आहे. या शेतकऱ्यांच्या रब्बी व उन्हाळी हंगामातील क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याचे नियोजन आहे. यासाठी ८२८६.५४ एकर जमीन उपलब्ध आहे. उपलब्ध पाणी आणि जमिनीचा योग्य वापर करून हिरव्या चाऱ्याचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

मुरघास निर्मितीतून चारा साठवणुकीला प्रोत्साहन

हिरव्या चाऱ्याची उपलब्धता हंगामानुसार बदलत असल्याने भविष्यातील गरज लक्षात घेऊन मुरघास निर्मितीवरही भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत तयार झालेले २ प्रकल्प व खाजगी ६ मुरघास (एनएलएम) प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे ८०० मे. टन चारा पुरवठा होऊ शकतो. मुरघासामुळे उपलब्ध हिरवा चारा साठवून ठेवणे आणि गरजेच्या काळात त्याचा वापर करणे शक्य होणार आहे.

शासकीय प्रक्षेत्रांवर चारा लागवड

पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या रांजणी प्रक्षेत्रावर ६० हेक्टर जिराईत जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यात आली आहे. याशिवाय पाणी उपलब्ध झाल्यास अतिरीक्त ४० हेक्टर क्षेत्र चारा लागवडीसाठी उपलब्ध होणार आहे. तसेच जत येथील वळुमाता पशुपैदास प्रक्षेत्रावर ३० हेक्टर क्षेत्रात चारा पिकांची लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. या दोन्ही प्रक्षेत्रांवरील चारा उत्पादन वाढविण्यासाठी सीएसआर निधीतून आर्थिक तरतुदीचे नियोजन असून, त्यातून सुमारे ५ हजार मे. टन चारा उपलब्ध होऊ शकतो.

शासकीय जमिनींचा चारा उत्पादनासाठी वापर

जिल्ह्यातील विविध ठिकाणी कृषी व वन विभागाच्या उपलब्ध शासकीय जमिनींचा उपयोग चारा लागवडीसाठी करण्याचे नियोजन सुरू आहे. तसेच विकसित भारत जी राम जी योजनेंतर्गत जिल्ह्यातील उपलब्ध गाळपेरा क्षेत्रावर चारा लागवड करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. उपलब्ध जमिनीचा प्रभावी वापर करून चारा उत्पादनाचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न आहे.

ऊस वाडे आणि पीक अवशेषांतूनही चारा उपलब्धतेचे नियोजन

जिल्ह्यात १ लाख ४२ हजार २०१ हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड करण्यात आली आहे. या क्षेत्रातून सुमारे ८ लाख ५३ हजार २०६ मे. टन उसाचे वाडे उपलब्ध होऊ शकतात. ऊस तोडणी मशीनऐवजी मजुरांमार्फत केल्यास जमिनीवर उसाचे वाडे उपलब्ध होण्यास मदत होईल. त्यामुळे ऊस वाड्यांचा जनावरांसाठी चारा म्हणून वापर करता येईल. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी साखर कारखानदारांशी बैठक घेऊन आवाहन केले आहे.

याशिवाय वनक्षेत्रातून ३७ हजार ९३० मे. टन आणि गायरान क्षेत्रातून ५ हजार मे. टन चारा उपलब्ध होऊ शकतो. इतर पिकांच्या अवशेषांमधून (उीि ठशीळवींश) देखील मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पारंपरिक चारा उत्पादनासोबतच उपलब्ध नैसर्गिक व कृषी स्रोतांचा उपयोग करण्यावर भर देण्यात येत आहे. इतर पिकांतून ८११४०८ मे. टन चारा उपलब्ध होऊ शकतो.

चारा साक्षरता आणि पशुआरोग्यालाही प्राधान्य

चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा योग्य वापर करणे, पौष्टिक चारा तयार करणे आणि चारा उत्पादनाचे पर्यायी मार्ग पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये चारा पीक लागवड, हायड्रोफोनिक पद्धतीने चारा उत्पादन, निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, अझोला उत्पादन आदि बाबींचा समावेश आहे. जिल्ह्यात चारा साक्षरता अभियानाच्या माध्यमातून पशुपालकांमध्ये या उपाययोजनांबाबत जागृती करण्यात येत आहे.

चारा उपलब्धतेसोबतच जनावरांचे आरोग्य जपण्यावरही भर देण्यात येत आहे. जनावरांचे लसीकरण करण्यात आले असून, त्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे.

अशा प्रकारे दुष्काळी परिस्थितीत उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करून चारा उत्पादन वाढविणे आणि संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना दिलासा देणे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रभावी नियोजन केले आहे.

– संप्रदा बीडकर
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

शेतकऱ्याचा पाच एकरावरील ऊस जळून खाक

(पान १ वरून..) कारखान्यात जाऊन चार पैसे मिळणार होते, पण नशिबाने शेतकऱ्याच्या पीकावर आगीचा वरवंटा फिरवला.

यंदाच्या वर्षी कमी पाऊस बरसल्याचा फटका मोठ्या प्रमाणात वाशिम जिल्ह्यात पहावयास मिळत आहे. पाणीटंचाईचा फटका आता फळबागांनाही बसू लागला आहे, जऊळका शिवारातील वडी येथील शेतकरी शिवाजी नागरे यांच्या अडीच एकर पेरूच्या बागेतील तब्बल १२०० झाडे पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर आहेत. अडीच एकर क्षेत्रात फुलवलेली ही बाग सुकतानां पाहण्याची वेळ शेतकऱ्यावर आलीय. विहिरीतील पाणीसाठाही संपलाय, धरणातून पाणी उपसा बंदी आहे. त्यामूळे शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या सुकणाऱ्या बागेतून गेल्यावर्षी तीन लाख रुपयांचे उत्पन्न मिळवलं होत. मात्र, यंदा पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने पेरू झाडे पाण्याअभावी करपू लागली आहेत. आता अनेक वर्षांच्या मेहनतीतून उभी केलेली ही फळबाग डोळ्यांदेखत सुकत असल्याने शेतकरी शिवाजी नागरे चिंतेत आहेत. इतर पिकांप्रमाणे फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची मागणी होतेय.

महूद बीटमध्ये अवैध धंद्यांना ऊत; सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



सांगोला/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील महूद बीट परिसरात अवैध धंद्याचा सुळसुळाट सुरू असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. महूद हे मोठ्या लोकवस्तीची गाव असून त्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात रहदारी असते. मात्र या परिसरामध्ये सुरू असलेली अवैद्य व्यवसाय त्यांना मिळत असलेला राजकीय अथवा कथित प्रशासकीय आश्रेय त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषमध्ये महूदमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या आशीर्वादाने अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप काही नागरिकांमधून केला जात आहे. तसेच संबंधित अवैध धंदे चालवणारा कडून मोठ्या प्रमाणात हप्ते घेत असल्याचे चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू असली ची नागरिकाची म्हणणे आहे .

या आरोपामध्ये कितपत सध्या याची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून निपक्ष चौकशी करणे आवश्यक आहे.

अवैद्य धंद्यामुळे सामाजिक वातावरणात विक्रीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत असून, स्थानिक पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित केला जात आहे. केवळ कागदपत्रे कारवाई न करता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष महूद बीटमध्ये परिसरात भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी अशी मागणी महूद मधील ग्राम स्थांकडून होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दिघाशी येथे आदिवासी शेतकऱ्याच्या भाताच्या भाऱ्यांना आग; दीडशे भारे जळून खाक

शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्याकडून आर्थिक मदत; शासकीय भरपाईसाठीही करणार पाठपुरावा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील दिघाशी येथे आग लागून आदिवासी शेतकरी शंकर वाघे यांचे भाताचे सुमारे दीडशे भारे जळून खाक झाले. या आगीत वर्षभराच्या मेहनतीचे मोठे नुकसान होऊन वाघे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेची माहिती मिळताच शिवसेना (शिंदे गट) नेते प्रकाश पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत नुकसानग्रस्त शेतकऱ्याची भेट घेतली. तसेच वाघे कुटुंबाला दिलासा देत स्वतःकडून २५ हजार रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली.



शंकर वाघे यांच्याकडे स्वतःची शेती अत्यंत कमी असल्याने त्यांनी गावातील इतर शेतकऱ्यांची जमीन खंडाने घेऊन यंदा भातशेती केली होती. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भाताचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे झाले नाही. अशा परिस्थितीत उपलब्ध झालेले पीक त्यांनी मेहनतीने कापून त्याचे भारे बांधले होते. हे भारे घराशेजारील मोकळ्या जागेत झोडणी व मळणीसाठी रचून ठेवण्यात आले होते. मात्र, मळणीची तयारी सुरू असतानाच अचानक भाऱ्यांना आग लागली. काही क्षणांतच सुमारे दीडशे भारे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

आग नेमकी कशामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, या दुर्घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. खंडाने घेतलेल्या जमिनीचा खर्च, वर्षभर केलेली मेहनत आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी साठवून ठेवलेले धान्य आगीत नष्ट झाल्याने वाघे कुटुंबासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच शिवसेना नेते प्रकाश पाटील यांनी दिघाशी येथे जाऊन जळालेल्या भाताच्या भाऱ्यांची पाहणी केली. त्यांनी शंकर वाघे व त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. यावेळी कोणत्याही परिस्थितीत संकटग्रस्त शेतकऱ्याला एकटे सोडणार नसल्याची भावना व्यक्त करत त्यांनी स्वतःकडून २५ हजार रुपयांची रोख मदत दिली.

यावेळी बोलताना प्रकाश पाटील म्हणाले की, आधीच कमी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यात आगीच्या दुर्घटनेमुळे उरलेसुरले पीकही नष्ट झाले. अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. या नुकसानीचा तातडीने पंचनामा व्हावा, यासाठी तहसीलदारांशी चर्चा करणार असून, संबंधित शेतकऱ्याला शासनाकडून आर्थिक भरपाई मिळावी यासाठी पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या दुर्घटनेमुळे दिघाशी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मेहनतीने पिकवलेले धान्य डोळ्यादेखत जळून खाक झाल्याने शेतकरी कुटुंबावर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन नुकसानीचा पंचनामा करावा आणि पीडित शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कार्तिक वारीत वारकरी भाविकांच्या सेवेसाठी नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांच्या सातत्यपूर्ण पुढाकार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भालके कार्तिक वारीत वारकरी भाविकांच्या सेवेसाठी साठी ते पूर्ण पुढाकार यावेळी त्यांनी दर्शनासाठी रांगेत उभे असलेल्या वारकरी भाविकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. तसेच पत्रा शेड परिसरातील आरोग्य सेवा व प्रथम उपचार केंद्राला भेट देऊन तेथील सुविधांची पाहणी केली आणि भाविकांच्या तातडीने व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना ही संबंधित आरोग्य कर्मचाऱ्याला देण्यात आले.

वारीला आलेल्या प्रत्येक वारकरी हा आपला भावना असून त्याची सेवा करणे ही आपली कर्तव्य आहे, या भावनेतून लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भालके यांनी कार्तिक वारीच्या संपूर्ण कालावधीत भाविकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्यरत आहेत.

पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या आरोग्य सेवा केंद्रासह स्वच्छता पाणीपुरवठा व इतर आवश्यक सुविधांची वेळोवेळी पाहणी करून भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची त्या विशेष दक्षता घेत आहेत.

मंगळवेढ्यातील दुष्काळी परिस्थिती व तातडीने उपायोजना करा!



अनिल सावंत यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मंगळवेढा/प्रतिनिधी

मंगळवेढा तालुक्यातील निर्माण झालेल्या दुष्काळजन्य गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी शेतमजूर व पशुपालकासह सर्वसामान्य नागरिक मोठ्या संकटात सापडले आहेत.

ग्रामीण भागातील पाणीटंचाई व जनावरांसाठी चाऱ्यांचा रोगांचा प्रश्न दिसून देऊन गंभीर होत आहे. असल्याने शासनाने तोच उपाय योजना करण्यात यावी अशी मागणी अनिल सावंत यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मंगळ तालुक्यामध्ये सध्या हिरवा चारा व सुखाचारा उपलब्ध होत नसल्यामुळे पशुपालनासाठी पशुपा जगण्यासाठी मोठे आव्हान निर्माण झाले आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. शासनाने तंत्रग्रस्त गावांमध्ये चारा छावण्या तरी सुरू करण्यात याव्यात चार डेपोसाठी पशुपालनासाठी उपलब्ध चारा निर्माण करून देण्यासाठी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मंगळवेढा तालुक्यासह अनेक गावांमध्ये वाडे वस्तीवर पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला तरी काही गावांमध्ये पुरुषे पाणी मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्व टंचाईग्रस्त गावांमध्ये वाड्यावर वस्त्यांवर मिनी ट्रॅक्टर वाली पाणीपुरवठा करावी तसेच जनावरांसाठी स्वतंत्र पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळ परिस्थितीमुळे शेतीची कामे ठप्प झाली असून, शेतकऱ्यांनी शेतमजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. परिणामी गावातील ग्रामीण भागातील कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे या पशु व रोजगार हमीची तातडी ही कामे सुरू करण्यात यावीत करण्यात यावी जलसंधारण कामे नाला खोलीकरण, मला वाटेल त्याला काढणे यासारख्या कामांना प्राधान्य देऊन स्थानिक रोजगारांना काम मिळवून देण्यासाठी अशी मागणी सावंत यांनी केली आहे.

मंगळवेढा तालुक्यातील शेतकरी शेतमजूर व पशुपालकांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने कागदपत्रे आढावा न घेता प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून गरजू नागरिकांना मदत पोहोचावी चारापाणी आणि रोजगार तीन प्रश्नावर मूलभूत प्रश्न तातडीने घेऊन ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा अशी आगरी मागणी अनिल सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

वेळापूर रोडवर घुमेरा वड्याजवळ भीषण अपघात; दोन तरुणाचा जागीच मृत्यू, एक गंभीर जखमी





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

माळशिरस/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यातील मळोली वेळापूर मार्गावर घुमेरा वड्याजवळ चार चाकी कार आणि मोटरसायकलचा भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये दोन तरुणांचा मृत्यू झाला असून एक गंभीर जखमी आहे.

चार चाकी कार आणि मोटरसायकलचा अपघात परिसरात हळहळ

अपघात ग्रस्त चार चाकी गाडी रस्त्या लगेचच्या खोलगट भागात उतरलेली दिसत आहे. सारख्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मोटरसायकल ही रस्त्याच्या कडेला पडलेली दिसत आहे. अपघात थळी दृश्यामध्ये नागरिकांची मोठी गर्दी झालेली दिसत आहे.

मिळालेली प्राथमिक माहिती अनुसार या अपघातात मळवली गावातील रोहन गणपत जाधव उर्फ आरजे, मयूर सुखदेव शिंदे या दोन या दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची सांगण्यात आले आहे. तर सागर तुळशीराम मगर हे गंभीर जखमी झाले आहे.

या दुर्घटनेमुळे मळोली गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघात नेमका कशामुळे घडला वाहनाचा वेग किती होता. आणि अपघाताची नेमकी परिस्थिती काय होती. याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. मुळोळी वेळापूर मार्गावरील या दुर्घटनेनंतर रस्ते सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अभय त्याच्या ठिकाणची रस्त्याची परिस्थिती दिशादर्शक फलक व आवश्यक सुरक्षा रुपयांची संबंधित यंत्रणेची पाहणी करणे आवश्यक आहे.

दोन तानांचा मृत्यूमुळे गावांमध्ये शोक व्यक्त होत आहे. जखमी तरुणाची प्रकृती बाबत पुढील अधिकृत माहिती प्रतीक्षा आहे.

कौशल्याधारित शिक्षणातून जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळ पुरविण्याची देशात क्षमता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्याचे कार्य शैक्षणिक संस्थांनी करावे



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे (जिमाका): केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून त्या पदवीसोबत उपयोजित ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आजच्या काळाची गरज आहे. बदलत्या रोजगार बाजारपेठेच्या आणि अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार युवकांचे कौशल्य विकसित केल्यास भारत केवळ स्वतः साठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देऊ शकतो. त्यामुळे कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्याचे कार्य शैक्षणिक संस्थांनी करावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

उल्हासनगर येथे हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट बोर्डच्या चंदीबाई हिंमतमल मनसुखानी (सीएचएम) महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार कुमार आयलानी, आमदार किसन कथोरे, आमदार सुलभाताई गायकवाड, एचएसएनसी बोर्डाचे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, उल्हासनगर महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, संस्थेचे विश्वस्त किशू मनसुखानी,अनिल हरीश, माया शहाणी, मंजू लालवाणी पाठक, आशिष दामले, राजेश वाधारिया, यशोधन डोंगरे आदी उपस्थित होते.

कौशल्य विकासातून तरुणांच्या क्षमतांना जागतिक संधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाच्या फाळणीनंतर सिंधी समाजातील अनेक कुटुंबांना आपली घरे, संपत्ती आणि सर्वस्व मागे सोडून भारतात यावे लागले. उल्हासनगर आणि मुंबईतील चेंबूरसह विविध ठिकाणी हा समाज स्थायिक झाला. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही या समाजाने मेहनत, जिद्द आणि उद्यमशीलतेच्या जोरावर पुन्हा उभारी घेतली. आज देशातील उद्योग, वैद्यकीय, अभियांत्रिकी, सनदी लेखा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये सिंधी समाजाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे ते म्हणाले.

फाळणीनंतर समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांच्या आयुष्याला दिशा मिळावी, या उद्देशाने १९४९ मध्ये वांद्रे येथे नॅशनल कॉलेजची स्थापना करण्यात आली. या शैक्षणिक उपक्रमाचा पुढे विस्तार होत एचएसएनसीच्या माध्यमातून आज विविध प्रकारच्या २७ संस्था कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठातील सर्वांत मोठे महाविद्यालयही या संस्थेमार्फत चालविले जात असून सुमारे १४ हजार विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्राकडे केवळ व्यवसाय किंवा पैसा कमावण्याचे साधन म्हणून न पाहता समाजनिर्मितीची व्यवस्था म्हणून पाहण्याची संस्थेची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नांमुळे संस्थेचे माजी विद्यार्थी देश-विदेशात विविध क्षेत्रांत यशस्वी झाले आहेत. संस्थेने निर्माण केलेली ही शैक्षणिक परंपरा आणि वारसा पुढे नेण्याचे काम विश्वस्त, प्राध्यापक आणि प्राचार्य करीत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

भारताकडे जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असून या लोकसंख्येला योग्य कौशल्य प्रशिक्षण दिल्यास भारताला जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळ पुरविण्याची मोठी संधी आहे. आजच्या अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार मानवी संसाधन विकसित करण्यासाठी कौशल्य विकास महत्त्वाचा आहे. या दृष्टीने सीएचएम संस्थेने सुरू केलेला उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

उल्हासनगरच्या पायाभूत विकासाला गती देणार

उल्हासनगरच्या विकासाबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उल्हासनगरचा समावेश मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाच्या व्यापक संकल्पनेत करण्यात आला आहे. शहरात मेट्रोची सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू असून मेट्रोमुळे शहराची कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. याशिवाय काँक्रीट रस्ते, उड्डाणपूल आणि स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची योजना यांसारख्या कामांना मान्यता देण्यात आली असून ही कामे सुरू होत आहेत.

उल्हासनगरला पुन्हा नियोजनबद्ध शहराचे स्वरूप देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. अनधिकृत ठरलेल्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांना अधिकृत करण्यासह क्लस्टर विकासाच्या माध्यमातून शहराचा नियोजनबद्ध व्यापक आराखडा तयार करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

सिंधी बांधवांना जमिनीचे मालकी हक्क देणार

उल्हासनगरमध्ये स्थायिक झालेल्या सिंधी समाजातील बांधवांना त्यांच्या जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे देणे आणि जमिनी फ्रीहोल्ड करणे याबाबत शासनाने निर्णय घेतल्याचे सांगत या प्रक्रियेची सुरुवात नागपूरपासून करण्यात आली असून लवकरच उल्हासनगरमध्येही ही प्रक्रिया राबविण्यात येईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

एचएसएनसी बोर्डाचे अध्यक्ष डॉ.निरंजन हिरानंदानी यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेताना, गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळात मुंबई महानगर प्रदेशात १४ महाविद्यालयांच्या माध्यमातून ४५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध शाखांमध्ये शिक्षण दिले जात असल्याचे सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसह शिक्षण आणि रोजगार यांमधील दरी कमी करण्यासाठी संस्थेने कौशल्याधारित प्रशिक्षणावर भर दिला आहे. भारत सरकारच्या सीडीटीआय योजनेंतर्गत तीन हजार आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी नमूद केले.

एचएसएनसी बोर्डाचे विश्वस्त अनिल हरीश यांनी संस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचा आढावा घेताना आजवर एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी सीएचएम महाविद्यालयातून शिक्षण घेतले असून, नव्या इमारतीकडे केवळ पायाभूत सुविधा म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची आणि संस्थेच्या पुढील शैक्षणिक वाटचालीची पायाभरणी म्हणून पाहिले पाहिजे,असेही त्यांनी नमूद केले. सीएचएम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मंजू लालवानी-पाठक यांनी प्रास्ताविक केले.

सोलापूर जिल्ह्यातील ऊस दराची कोंडी फुटली

जिल्हाधिकाऱ्याच्या प्रस्ताव कारखानदारांना मान्य; पहिली उचल ३२५० रुपये पुढे १००-१०० रुपयाची दोन हप्ते देण्याची लेखी आश्वासन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : सोलापूर जिल्ह्यातील ऊस दादा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी३५००/रुपये ऊस दर देण्याची मागणी लावून धरल्यानंतर निर्माण झालेली कोंडी फोडण्याची जिल्हाधिकारी एस कीर्तीकेयन यांनी साखर कारखानदारावर ठेवलेला प्रस्ताव अखेर कारखानदारांनी मान्य केला आहे.

या प्रस्तावानुसार पहिली उचल ३२५० रुपये मग त्यानंतर १०० रुपये दिवाळीच्या सुमारास आणखी १०० असे एकूण ३४५० रुपये देण्याचे कारखानदारांनी मान्य केले आहे. याबाबत जिल्ह्यातील प्रमुख साखर कारखानदारांनी जिल्हाधिकारी कार्यालय लेखी पत्र दिल्याने ऊस दराची कोटी फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३५०० रुपये दर मिळावा अशी मागणी स्वाभिमानी अध्यक्ष शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी केली होती. या मागणीसाठी त्यांनी मागील आठवड्यात सोलापूर येथे जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत कारखानदार आणि शेतकरी यांच्यात मीटिंग घेतली होती

मात्र या बैठकीत कोणताही ठोस तोडगा निघाला नाही त्यामुळे



शेतकरी संघटना आक्रमक भूमिका घेत रस्ता रोको आंदोलन केले. तसेच कारखानदारांना दोन दिवसाचा अल्टिमेट देत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.

जिल्हाधिकाऱ्यांचा मध्यस्थीचा प्रस्ताव,

ऊस घराचा निर्माण झालेला तणाव लक्षात घेऊन जिल्हाधिकारी एस किर्तीकेयन मध्यस्थ केली कारखानदारांनी शेतकरी यांच्यात तोडगा निघावा यासाठी त्यांनी कारखानदारासमोर टप्प्याटप्प्याने ऊस दर प्रस्ताव ठेवला, या प्रस्तावावर प्रति टन पहिली उचल ३२५० रुपये देणे त्यानंतर १०० रुपये आणि साखरेचा दर ४५ रुपये झाल्यास अतिरिक्त १०० रुपये देण्याची अट प्रस्तावत असल्याने सांगण्यात आले आहे या प्रस्तावामुळे कारखानदारी शेतकरी यांच्यातील ऊर्जा प्रश्न सुटण्याची मार मोकळा झाला आहे.

२४ नोव्हेंबर चा रस्ता रोको पूर्वीच कारखानदाराची माघार.

स्वाभिमानी शेतकरी संघटना ऊस दराचा प्रश्न मार्गी न लागल्यास इथे २४ नोव्हेंबर पासून टेंभुर्णी पुणे मार्गावर रस्ता रोको करण्याचा इशारा दिला होता. आंदोलनामुळे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता होती. मात्र आंदोलनाची तारीख जवळ येताच कारखानदारांनी जिल्हाधिकारी चा प्रस्ताव मान्य करून लिखे आश्वासन दिलेली संघर्ष टाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शेतकरी संघटनेची भूमिका महत्वाची,

कारखानदारांनी ३४५० रुपयांचा आता मान्य केला असला श्री स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मूळ मागणी प्रति टन ३५०० रुपये त्यामुळे शेतकरी संघटना ३४५० रुपये ला मान्यता देते का, यावर पुढील आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

प्रभाग क्रमांक ६५,अंधेरी पश्चिम येथे सार्वजनिक शौचालयाच्या मोकळ्या जागेवरील संभाव्य अतिक्रमणाबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई (प्रतिनिधी); अंधेरी पश्चिम येथील राहत सोसायटी,व्ही.पी.रोड,खोजा जमातखान्याच्या मागे, अन्सारी मोहल्ला,मुंबई - ४०००५८ येथे सार्वजनिक शौचालयाच्या मोकळ्या जागेवर संभाव्य अतिक्रमण होत असल्याने याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.स्थानिक नागरिकांच्या मनात हे अतिक्रमण स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माहितीने किंवा संरक्षणाखाली होत आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच प्रभाग क्रमांक ६५ चे नगरसेवक विठ्ठल बांधरी यांच्या भूमिकेबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.एकीकडे अतिक्रमणाविरोधात भूमिका मांडली जाते,तर दुसरीकडे सार्वजनिक जागांवरील संभाव्य अतिक्रमणाबाबत नागरिकांना तक्रारी कराव्या लागत आहेत,ही अत्यंत गंभीर बाब आहे.



याबाबत स्थानिक नागरिकांच्या प्रमुख मागण्या :

१.या संपूर्ण प्रकरणाची तातडीने व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. २.संबंधित मोकळ्या जागेची मालकी व कायदेशीर स्थिती तपासण्यात यावी. ३.अतिक्रमण अनधिकृत असल्याचे आढळल्यास ते तात्काळ हटवण्यात यावे. ४.संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर योग्यती कारवाई करण्यात यावी. तातडीच्या कारवाईसाठी निश्चित कालमर्यादा:

महानगरपालिका आयुक्त आणि प्रभाग क्रमांक ६५ मधील संबंधित महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ही तक्रार प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी आणि ७ दिवसांच्या आत लेखी कृती अहवाल (लींळेप ढरज्ञशप ठर्शीीी) सादर करावा.निर्धारित मुदतीत कारवाई न झाल्यास नागरिकांना हा विषय वरिष्ठ महानगरपालिका अधिकारी व संबंधित शासकीय विभागांकडे घेऊन जाण्याचा अधिकार राहील.सार्वजनिक जागा या जनतेच्या मालकीच्या आहेत,कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक वापरासाठी नाहीत. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

या प्रकरणात पारदर्शकता,जबाबदारी आणि निश्चित कालमर्यादेत ठोस कारवाई अपेक्षित आहे.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश

सांगोला आगारात चौथ्या टप्प्यात आणखी ५ नव्या बसेस दाखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सांगोला (तालुका प्रतिनिधी):सांगोला एसटी आगाराला नव्या बसेस मिळाव्यात, ही आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची सातत्यपूर्ण मागणी अखेर पूर्णत्वास जात आहे. त्यांच्या मागणीला आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, चौथ्या टप्प्यात आणखी ५ नव्या बसेस सांगोला आगारात दाखल झाल्या आहेत. त्यामुळे आतापर्यंत सांगोला आगाराच्या ताफ्यात एकूण २० नव्या बसेस दाखल झाल्या आहेत. सांगोला आगारातील जुन्या बसेसची संख्या आणि प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेता आगाराला नव्या बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली होती. यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे टप्प्याटप्प्याने सांगोला आगाराला नव्या बसेस उपलब्ध होत आहेत. यापूर्वी १५ नव्या बसेस मिळाल्या होत्या. आता चौथ्या टप्प्यात आणखी ५ बसेस दाखल झाल्याने एकूण संख्या २० झाली आहे.

या नव्या बसेसमुळे विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी, कामगारांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी तसेच दैनंदिन प्रवास



करणाऱ्या नागरिकांना अधिक आरामदायी आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. सांगोला आगाराला नव्या बसेस उपलब्ध करून देण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार तसेच राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे सांगोला आगाराच्या ताफ्यात नव्या बसेस दाखल होत असून, याचा थेट लाभ सांगोला तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना होणार आहे.

सांगोला आगाराच्या ताफ्यात एकूण २० नव्या बसेस दाखल झाल्याने एसटी सेवेची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि अधिक सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी आपण यापुढेही प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी म्हटले आहे.

यापूर्वी १५, आता आणखी ५; सांगोला आगारात २० नव्या बसेस!

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यापूर्वी सांगोला एसटी आगाराला १५ नव्या बसेस मिळाल्या होत्या. आता चौथ्या टप्प्यात आणखी ५ बसेस दाखल झाल्याने आगाराच्या ताफ्यातील नव्या बसेसची एकूण संख्या २० झाली आहे.

पडघा पाणीपुरवठा योजनेसंदर्भात आढावा बैठक; डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यापासून फिल्टर पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा गावातील बहुप्रतीक्षित पाणीपुरवठा योजनेच्या कामाला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. डिसेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून पडघावासीयांना फिल्टर केलेला शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहे. शिवसेनेचे नेते प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या पडघा येथील कार्यालयात पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत योजनेतील प्रलंबित कामे, नवीन जलवाहिनीचे काम आणि पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता केतन चौधरी, शाखा अभियंता सुभाष धोत्रे, पडघा ग्राम पंचायत अधिकारी तसेच संबंधित ठेकेदारांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी पाणीपुरवठा योजनेच्या आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती घेऊन उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. बैठकीत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाणी साठवण टाकी आणि फिल्टरेशन प्लांटचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, जूपाडा येथील जलस्रोतापासून पाणी साठवण टाकीपर्यंत सुमारे ३७०० मीटर लांबीची नवीन पाइपलाइन टाकणे अद्याप बाकी आहे. या पाइपलाइनचे काम पुढील आठवड्यात सुरू करण्यात येणार असून, ते पूर्ण करण्यासाठी साधारण तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

मात्र, नवीन पाइपलाइनचे काम पूर्ण होईपर्यंत ग्रामस्थांना पाण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतून आवश्यक पाणी जोडणी करून तात्पुरती व्यवस्था उभी केल्यास डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पडघा गावाला फिल्टर केलेला पाणीपुरवठा सुरू करणे शक्य असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे अनेक दिवसांपासून स्वच्छ पाण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या पडघावासीयांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पडघा गावातील नागरिकांना स्वच्छ, शुद्ध आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, ही ग्रामस्थांची अनेक दिवसांपासूनची मागणी आहे.



पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होऊन प्रत्यक्षात घराघरांत नळाद्वारे फिल्टर पाणी पोहोचणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने न देता कामाला प्रत्यक्ष गती देऊन निर्धारित वेळेत योजना कार्यान्वित करावी, या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामातील अडचणी दूर करून उर्वरित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

या आढावा बैठकीला शिवसेनेचे नेते प्रकाश पाटील, मनसेचे जिल्हाप्रमुख शैलेश बिडवी, पडघा ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे, माजी सभापती डॉ. संजय पाटील, माजी सरपंच अमोल बिडवी, माजी सरपंच प्रभावती जाधव, माजी सरपंच सायली पाटील, माजी उपसरपंच अभिषेक नागावेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पडघा गावाच्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी साठवण टाकी आणि फिल्टरेशन प्लांटचे काम पूर्ण झाले असले, तरी नवीन जलवाहिनीचे काम आणि पर्यायी जोडणी व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे. डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यापासून फिल्टर पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आल्याने ग्रामस्थांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आता संबंधित विभाग हे आश्वासन कितपत पाळतो आणि पडघावासीयांना प्रत्यक्षात स्वच्छ व नियमित पाणी कधी मिळते, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

शिवप्रहार राष्ट्रीय लघुपट महोत्सव २०२६ साठी संजय सोनवणे यांच्या लघुपटाची अधिकृत निवड

चाळीसगावच्या कलाक्षेत्राचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

१७० हून अधिक लघुपटांमधून निवडलेल्या ९४ लघुपटांमध्ये 'सावित्रीची शाळा'ची बाजी!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे

चाळीसगाव : देशभरातून शिवप्रहार राष्ट्रीय लघुपट महोत्सव २०२६ मध्ये सहभागी झालेल्या १७० हून अधिक लघुपटांमधून अंतिम निवड करण्यात आलेल्या ९४ लघुपटांमध्ये चाळीसगावच्या 'सावित्रीची शाळा' या लघुपटाने स्थान मिळवले आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीशिक्षणाच्या विचारांना कलात्मक अभिव्यक्ती देणाऱ्या या लघुपटाला महोत्सवात 'जत्रज्ञखउखड डएडएउढखजछ २०२६' हा मान मिळाला आहे. त्यामुळे चाळीसगावच्या कलाक्षेत्रासाठी ही अभिमानास्पद आणि आनंदाची बाब ठरली आहे.

चाळीसगावचे भूमिपुत्र निर्माता व दिग्दर्शक संजय सोनवणे यांनी या लघुपटाची निर्मिती केली आहे. सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणातून निर्माण होणारा आत्मसन्मान या विषयांना या लघुपटातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहे.

महोत्सवाचे आयोजन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. २ ऑगस्ट रोजी आमदार बच्चू कडू आणि कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत या स्पर्धेची घोषणा करण्यात आली होती. महोत्सवाचा अंतिम निकाल जानेवारी महिन्यात मुंबई येथे जाहीर होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

संपूर्ण कलाकार व तंत्रज्ञ टीमचे विशेष योगदान



या लघुपटात सावित्रीबाईंची भूमिका सरिता सोनवणे यांनी साकारली आहे. तसेच दमौतीबाई खैरनार, सोनाली लोखंडे आणि तेजश्री बाविस्कर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

लघुपटाचे लेखन व गीतलेखन मंगेश सरदार (बामरेकर) यांनी केले असून पार्श्वसंगीत सचिन कुमावत, गायन प्रिया गायकवाड, संगीत संजय सोनवणे नानासाहेब बागुल. आणि संगीत संयोजन गौरव सुपवते यांनी सांभाळले आहे. छायांकन गणेश भोई, विशाल भोई आणि सागर सूर्यवंशी यांनी केले असून पोस्ट प्रॉडक्शनची जबाबदारी विशाल भोई यांनी पार पाडली आहे.

'सावित्रीची शाळा' हा लघुपट स्त्रीशिक्षण, संघर्ष, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी कलाकृती आहे. देशभरातील १७० हून अधिक लघुपटांमधून निवड झालेल्या ९४ अधिकृत लघुपटांमध्ये या कलाकृतीचा समावेश होणे, ही संपूर्ण कलाकार, निर्माता, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ टीमच्या मेहनतीची पोचपावती आहे.

या निवडीची माहिती लघुपट स्पर्धेचे प्रमुख संदीप मोहिते पाटील यांनी दिली. या यशाबद्दल निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे आणि संपूर्ण टीमचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून चाळीसगावच्या कलाक्षेत्रातून या यशाचे स्वागत केले जात आहे.